वाचा - 1) म.सहसंचालक,आरोग्य सेवा,(हिवताप,हत्तीरोग व जलजन्य रोग) पुणे-1 यांचेकडील पत्र जा.क्र.ससंआसे/आस्था/कक्ष-53अ/प्रशिक्षण/18-19/7760-93/2018 दिनांक 22 मे 2018 अन्वये.

2) कार्यालयीन मंजुर टिपणी दिनांक 16 /06/2018

---

आदेश

नाशिक जिल्हा परिषद नाशिक
आरोग्य विभाग
जा.क्र.आरोग्य/आस्था-5/525 /2018
दिनांक - 16 /06/2018

उक्तरोक्त संदर्भिय आदेशान्वये कम्युनिटी हेल्थ केअर पदविका व डिप्लोमा इन हेल्थ प्रमोशन एज्युकेशन प्रशिक्षण सन 2018-2019 या वर्षात प्रशिक्षणासाठी दि.18/06/2018 पासुन सुरु होणाऱ्या (01) एक वर्षाच्या कालावधीच्या सत्रासाठी प्रशिक्षणार्थीस कुटुंब कल्याण प्रशिक्षण व संशोधन केंद.खेतवाडी,मुंबई 400 004 येथे खालील आरोग्य सेविका (महिला) यांची निवड करणेत येत आहे.

संबधित प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षणाचे ठिकाणी हजर होणेसाठी तात्काळ कार्यमुक्त करणेत यावे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | हुद्दा | प्रा.आ.केंद्रांचे नांव व तालुका |
|---|---|---|---|
| 1 | श्रीम.गायत्री वसंत खैरनार | आरोग्य सेविका (म) | प्रा.आ.केंद्र.जयदर,उपकेंद.पिंपळे खुर्द,ता.कळवण |
| 2 | श्रीम.लिना रामदास सावंत | आरोग्य सेविका (म) | प्रा.आ.केंद्र.लोहणेर, (ओपीडी) ता.देवळा |

**अटी व शर्ती:-**

१. सदरचे प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर उमेदवारांनी कमीत कमी 5 वर्षे शासनाची सेवा करणे आवश्यक राहील व सदर कालावधीमध्ये त्यांना आरोग्य खात्याबाहेर कोणत्याही पदासाठी अर्ज करता येणार नाही.वरील प्रमाणे 5 वर्षे सेवा न केल्यास सदर प्रशिक्षणावर झालेला खर्च वेतन व भत्त्यासह अधिक दंडनिय व्याज महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम 1981 मधील वित्तीय नियमांच्या तरतुदीनुसार वसुल करण्यात येईल.उमेदवारांकडुन तशा प्रकारचे बंधपत्र प्रशिक्षणास जाण्यापुर्वी घेतलेले असुन त्यास अधिन राहून प्रशिक्षणास निवड केली आहे.

२. मुंबई येथे जाण्या-येण्यासाठी प्रवास खर्च जो देय व अनुज्ञेय असेल तो देण्यात येईल.

३. नेहमीप्रमाणे उमेदवारांना जे वेतन व भत्ते मिळत असतील ते प्रशिक्षण कालावधीमध्येही उमेदवारांस मिळतील.तसेच प्रशिक्षण कालावधीमध्येही त्यांना घरभाडे भत्ता महाराष्ट्र नागरी सेवा नियमा प्रमाणे देण्यात येईल.

४. महाराष्ट्र नागरी सेवा नियमाप्रमाणे प्रशिक्षणार्थीना मुक्काम भत्ता अनुज्ञेय राहील.

५. प्रशिक्षण संपुष्टात आल्यानंतर उमेदवार त्यांच्या मुळ जागेवर हजर होतील.

६. सदरचे प्रशिक्षण पुर्ण झाले आहे म्हणुन पदोन्नती किंवा वरिष्ठ व पदाचे कोणतेही फायदे दिलेच पाहीजेत असे शासनावर बंधन राहणार नाही व तशी हमी शासन देऊ शकणार नाही,या अटीवर त्यांना प्रशिक्षणासाठी पाठविण्यात आले आहे.

७. प्रशिक्षणासाठी प्रवेश फी आणि शिक्षण फी प्रशिक्षणार्थीना त्यांचे संबंधीत कार्यालयाकडुन अदा करण्यात येईल.

८. सदरचा खर्च उमेदवारांना मिळणा-या वेतन व भत्ते ज्या मुख्य लेखाशिर्षाखाली देण्यात येतो त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची पडेल.

सदर प्रशिक्षणासाठी **श्रीम.खैरनार व श्रीम.सांवत,आरोग्य सेविका (म) यांना दि.** 16/06/2018 रोजी कार्यमुक्त करण्यात यावे.तसेच प्रशिक्षणार्थीनी प्रशिक्षणास त्वरीत हजर व्हावे.तसेच संबंधीत आरोग्य सेविका (महिला) यांचे प्रत्येक महीन्याचे हजेरीपत्रक या कार्यालयास न चुकता सादर करावे. सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नाशिक

प्रति,

१) श्रीम. गायत्री वसंत खैरनार ,आरोग्य सेविका (म) प्रा.आ.केंद्र.जयदर, ता.कळवण.

२) श्रीम. लिना रामदास सावंत,आरोग्य सेविका (म) प्रा.आ.केंद.लोहणेर,ता.देवळा.

प्रत - १) तालुका आरोगय अधिकारी, पंचायत समिती,देवळा/कळवण

२) वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र.जयदर,लोहणेर ता.कळवण/देवळा

प्रतिलीपी- म.सहसंचालक कुटुंबकल्याण प्रशिक्षण व संशोधन केंद्र खेतेवाडी मुंबई -400004 यांना माहीतीस्तव

प्रतिलीपी- म.सहसंचालक आरोग्य सेवा (आरोग्य) पुणे यांना माहीतीसाठी व योग्य त्या कार्यावाहीसाठी रवाना.

प्रतिलीपी-म.महासंचालक आरोग्य सेवा मुंबई -01 यांना माहीतीसाठी सादर

प्रतिलीपी-म.उपसंचालक आरोग्य सेवा नाशिक मंडळ नाशिक यांना माहीतीसाठी रवाना

प्रतिलीपी- म.वैदयकिय अधिकारी जिल्हा प्रशिक्षण पथक नाशिक.

प्रत :- मध्यवर्ती माहिती तंत्र कक्ष (आयटी सेल) सामान्य प्रशासन विभाग,जि.प.नाशिक.